स्थायी समितीच्या बुधवार दिनांक 23–08–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 6. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 8. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 9. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 10. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 11. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 12. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 13. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 14. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 2. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 135:– शहरबस वाहतुकीअंतर्गत नविन ग्रीन बस ऑपरेटर यांची {परिवहन विभाग} नियुक्ती व नविन बसेस संचलनासह 'व्यवहार्यता अहवाल व व्यवहार सल्लागार सेवा' चे कामाबाबतचा सविस्तर डी.पी.आर. तयार करण्याचे कार्य स्थायी समिती ठराव क्र. ९०, दि. ११/०६/२०१५ अन्वये सल्लागार मे. डि.आर.ए कन्सल्टंट प्रा. लि. नागपूर यांना अतिरिक्त कामाबाबतचा कार्यादेश वाहतुक विभागाच्या वतीने क्र. ट्रॉफिक/८८१, दि.२३/०६/२०१५ अन्वये बसेसच्या किंमतीला अनुसरून १.२५ टक्के (Capital Cost of Bus) बसेसचे दरावर ४० टक्के ने कमी दरामध्ये सुट देवून विस्तृत

आराखडा (DPR) तयार करवून कार्यान्वित करतांनाच मा. आयुक्त, मनपा यांनी दि. ०२/०९/२०१५ रोजी नविन डिझेल बस खरेदी व संचालना बाबत तसेच आय.बी.टी.एम. ऑपरेटर यांच्या नियुक्तीची सुध्दा कार्य करण्याचे मौखिक आदेश दिले.

अ) मे. दिनेश राठी अॅन्ड असोसिएट्स यांचा कामाची व्याप्ती (Scope Of Work) ही केवळ बस ऑपरेटर नियुक्ती करणे असून त्यानूसार एकुण ५५ ग्रिन बसेसच्या पुर्ण व्यवहार्यता अहवाल (Prefeasibility Report) आणि व्यवहार सल्लागार सेवा (Transaction Advisory Services) सेवा प्रदान करण्यात आली असून त्यानुसार M/s. Scania Commercial Vehicle India Pvt. Ltd, (Bengaluru) यांना दि. १०/११/२०१६ रोजी स्विकृती पत्र (Letter of Intent) देण्यात आले असून त्यानुसार तिन टप्यामध्ये बसेस खरेदी करून देणे आहे. त्यापैकी ०५ ग्रीन बसेस आलेल्या असून त्या ऑपरेटरतर्फे नागपूर शहरामध्ये सेवा देत आहे.

ब) मे. दिनेश राठी अॅन्ड असोसिएट्स यांचा कामाची व्याप्ती (Scope of Work) ही केवळ बस ऑपरेटर नियुक्ती करणे असून त्यानूसार एकुण १५० नविन मिडी बसेस साठी व्यवहार सल्लागार सेवा (Transaction Advisory Services) प्रदान करण्यात आली असून त्यानुसार M/s. Travel Time Car Rental Pvt. Ltd., (Pune), M/s. Shyama Shyam Services Centre (New Delhi) and M/s. Samrt City Bus Seva (Nagpur) दि. २७/१०/२०१६ रोजी स्विकृती पत्र (Letter of Intent) देण्यात आले असून त्यानुसार पाच टप्यामध्ये बसेस खरेदी करून देणे आहे. त्यापैकी प्रत्येक डिझेल बस ऑपरेटरच्या ४५ मिडी बसेस आलेल्या असून त्या ऑपरेटरतर्फे नागपूर शहरामध्ये सेवा देत आहे.

मा. आयुक्तांचे मौखिक आदेशा नुसार व अभिप्राया नुसार झालेल्या कामाची कार्योत्तर मान्यता स्थायी समिती कडुन मंजुर करून घेणे आवश्यक राहील. त्याअनुषंगाने, मे. दिनेश राठी अॅन्ड असोसिएट्स यांनी मनपाच्या वतीने दिलेल्या कार्यादेशाला व मा. आयुक्त, महोदय यांचे प्राप्त निर्देशाला अनुसरून ग्रीन बस ऑपरेटर नियुक्तीचे कार्य या व्यतिरिक्त विहीत मान्यता स्वतंत्रपणे न घेता डिझेल बस ऑपरेटर व आय.बी.टी.एम. नियुक्तीचे संबधीत प्रक्रिया पुर्ण केली असल्याने ग्रीन बस करीता रू. ४७,४३,७५०/- व तसेच डिझेल बस करीता रू.६२,९६,२५०/- (सर्व करा सहित) सल्लागार शुल्क म्हणून मे. दिनेश राठी अॅन्ड असोसिएट्स यांना देय राहिल. मे. दिनेश राठी अॅन्ड असोसिएट्स यांचे देयक Traffic Department यांच्यामार्फत कार्यादेश, करारनामा पत्र आणि देयक अदा करण्यात येईल. त्याकरिता विशेष बाब म्हणून झालेल्या कामाची कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 136:- {अरोग्य विभाग} स्थायी समिती ठराव क्रमांक १६८ दिनांक ३१/०५/२०१६ अन्वये आरोग्य विभागाकरिता जंतुनाशक साहित्स खरेदीच्या निविदा दरकरार दोन वर्षाकरिता मागविण्यात आल्या असुन खालील निम्नतम दरानुसार प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | साहित्याचे नाव | निम्नतम दर प्रती लिटर/किलो | आवश्यक संख्या | खर्च एकुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | में. डॉल्फीन सेल्स कॉपोरेषन ठाणे | Nuvan 76% EC | 100 Ltr. | रु. 835/- | 83,500/- |
| २ | में. डॉल्फीन सेल्स कॉपोरेषन ठाणे | Pyrosene Oil CIB Registration & ISI mark | 1500 Ltr. | रु. 700/- | 10,50,000/- |
| ३ | में. डॉल्फीन सेल्स कॉपोरेषन ठाणे | Temegaurd 50% EC(Temegaurd 50% EC) CIB Registration & ISI mark | 1000 Ltr. | रु. 1450/- | 14,50,000/- |
| ४ | में. डॉल्फीन सेल्स | Pyrethrum 2% Ext. CIB | 400 Ltr. | रु. 2185/- | 8,74,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कॉर्पोरेषन ठाणे | Registration & ISI mark | | | |
| ५ | में. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेषन ठाणे | A quation TMFI/Green B | 400 Ltr. | रु. 4945/— | 19,78,000/- |
| ६ | में. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेषन ठाणे | Lakshaya (Delfamethrin 1.25 ulv) Registration & ISI mark | 200 Ltr. | रु. 2150/— | 4,30,000/- |
| | में. रमेश ॲग्रो केमी कॉ. ठाणे | Lakshaya (Delfamethrin 1.25 ulv) Registration & ISI mark | 200 Ltr. | रु. 2150/— | 4,30,000/- |
| ७ | में. रमेश ॲग्रो केमी कॉ. ठाणे | Baculluis Thurengsisies Isaratensis BIT H-14 in Aques Suspension approved & recomanded by NVBD Cp/TAC | 1800 Ltr. | रु. 1495/— | 26,91,000/- |
| | | एकुण रक्कम | | | 89,86,500/— |

वर नमुद निम्नतम दरावर एकूण ७ साहित्यांच्या नावासमोर नमुद निविदाकारा कडून वर्ष २०१७—१८ च्या खरेदीवर वार्षिक रुपये ८९,८६,५००/— खर्च अपेक्षित हा खर्च पद क्रमांक २०६ व ६०६ A२३१०१२२२७०२— A४४२०१२७२२०२ किंवा इतर पदामधुन भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 137ः— {वित्त विभाग} म.न.पा. वित्त विभागात वित्तीय वर्षात उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ, जे.एन.एन.यु.आर.एम., डी.पी.डी.सी. ची रोखपुस्तके लिहीणे, कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चिती व सेवानिवृत्तीचे प्रकरणाची तपासणी करणे तसेच उपसंचालक (ले.प.) यांचे अधिपत्याखाली म.न.पा. विभागाचे अंतर्गत उपसंचालक (ले.प.) यांचे नियंत्रणाखाली लेखापरिक्षणाची कामे करण्यासाठी कार्यरत सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याने त्यांना देण्यात आलेली मुदतवाढ संपल्यामुळे,

1. श्री.ग.बो.पारखी, से.नि. जिल्हा लेखा परिक्षक, मुदतवाढ दि. 1/8/2017 पासून.
2. श्री.ता.ऊ.गजभिये, से.नि. लेखा अधिकारी, मुदतवाढ दि. 1/8/2017 पासून.
3. श्री.श्रीकांत आंबटकर, से.नि. लेखा अधिकारी, मुदतवाढ दि. 5/10/2017 पासून.

यांना त्यांचे नांवापुढे दर्शविलेल्या तारखेपासून मा. आयुक्तांचे दिनांक 3/8/2017 चे आदेशानुसार पुढील एक वर्षाकरीता रु. 10,000/— प्रति माह मानधनावर मुदतवाढ मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 138ः— {वित्त विभाग} म.न.पा. वित्त विभागात वित्तीय वर्षात उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ जे.एन.एन.यु.आर.एम., डी.पी.डी.सी. ची रोखपुस्तके लिहीणे, कर्मचाऱ्यांच्या वेतननिश्चिती व सेवानिवृत्तीचे प्रकरणाची तपासणी करणे तसेच उपसंचालक (ले.प.) यांचे अधिपत्याखाली म.न.पा. विभागाचे अंतर्गत उपसंचालक (ले.प.) यांचे नियंत्रणाखाली लेखापरिक्षणाची कामे करण्यासाठी कार्यरत सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याने त्यांना देण्यात आलेली मुदतवाढ संपल्यामुळे,

1. श्री.कृ.दा.नासरे, से.नि. उपलेखापाल, मुदतवाढ दि. 1/8/2017 पासून.
2. श्री.देवराव ब.चाफले, से.नि. लेखा अधिकारी, मुदतवाढ दि. 1/9/2017 पासून.

यांना त्यांचे नांवापुढे दर्शविलेल्या तारखेपासून मा. आयुक्तांचे दिनांक 3/8/2017 चे आदेशानुसार पुढील एक वर्षाकरीता रु. 10,000/— प्रति माह मानधनावर मुदतवाढ मंजुरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 139ः— {आरोग्य विभाग} वाढत्या नागरीकीकरणामुळे शहरांची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण शहरातील पायाभूत सुविधांवर पडतो तसेच अतिक्रमणांची संख्या वाढणे, कच—याचे प्रमाण वाढणे, उघडयावरती कचरा फेकण्याचे प्रमाण वाढणे, उघडयावर जनावरे बांधणे त्यामुळे अस्वच्छतेचे उपद्रव निर्माण होतात. तसेच नागरीकांकडून बिनापरवाना होर्डींग उभारणे, बांधकामाचा मलबा रस्त्यावर टाकणे, थुकणे, घाण फेकणे, व्यवसायीकांनी,

ठेलेवाल्यांनी परीसर अस्वच्छ करणे इत्यादी प्रकारही घडत असतात अशा प्रकारचा उपद्रव शोधून काढून त्यावर वेळीच दंडनीय कार्यवाही केल्यास शहर परीसरात स्वच्छता व शिस्तीचे वातावरण निर्माण करणे शक्य होवु शकते.

त्यादृष्टीने उपद्रव शोध पथके (Nuisance detection squad) निर्माण करण्याचा प्रस्ताव मनपा ठराव क्र. ५३, दिनांक २०/०६/२०१७ नुसार सुचनेसह मंजुर करण्यात आलेला आहे. त्यानंतर मा. महापौर, सत्तापक्ष नेता, स्थायी समिति सभापती, आरोग्य समिती सभापती व मा. आयुक्त यांच्या झालेल्या बैठकीत प्रती प्रभाग २ प्रमाणे ७६ रक्षक, १० झोन सुपरवॉयझर, १ विशेष कार्य अधिकारी नेमण्याचे निर्णय झाला आहे. त्यापोटी होणारा अपेक्षित खर्च आणि उपद्रवाच्या प्रकारानुसार आकारावयाचे प्रशासकीय शुल्क ठरविण्याचा ठराव आहे. त्यानुसार अपेक्षित खर्च खालील प्रमाणे

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | प्रतिमाह वेतन (प्रति व्यक्ती) | प्रतिमाह वेतन (एकूण पदांकरिता) | वार्षिक वेतन (एकूण पदांकरिता |
|---|---|---|---|---|---|
| १ | रक्षक | ७६ | २४,०००/— | १८,२४,०००/— | २,१८,८८,०००/— |
| २ | सुपरवायझर | १० | ३०,०००/— | ३,००,०००/— | ३६,००,०००/— |
| ३ | विशेष कार्य अधिकारी | ०१ | ४०,०००/— | ४०,०००/— | ४,८०,०००/— |
| | एकूण | ८७ | ९४,०००/— | २१,६४,०००/— | २,५९,६८,०००/— |

रु. २,५९,६८,०००/— या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे तसेच सदरचा खर्च पद क्र. A२४००१२२१९०५ (अस्वच्छता निर्मुलन दक्षता पथक प्रशासकीय व प्रवर्तन व्यय) मधून करता येईल. चालु आर्थिक वर्षामध्ये सदर पदाअंतर्गत रु. २ कोटी ची तरतुद उपलब्ध असून त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

उपद्रवाचे प्रकार व प्रस्तावित प्रशासकिय शुल्क बाबत प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

उपद्रवाचे प्रकार व प्रस्तावित प्रशासकीय शुल्क

| अ. क्रं. | ठिकाण | प्रशासकीय शुल्क |
|---|---|---|
| १ | सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी थुंकणे | रु. ५०/— |
| २ | सार्वजनिक ठिकाणी रस्ता,फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी/उघडयावर मलमुत्र विसर्जन करणे | रु. १००/— |
| ३ | हाथगाडया, स्टॉल्स्, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परीसरात अस्वच्छता करणे | रु. २००/— |
| ४ | व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. ५०/— |
| ५ | दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. २००/— |
| ६ | शैक्षणिक संस्था, कोचिंग क्लासेस अश्या संस्थांनी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. ५००/— |
| ७ | दवाखाने, इस्पितळे, पॅथलॅब इत्यादींनी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. १०००/— |
| ८ | मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींगचे हॉटेल, सिनेमाहॉल, मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. १०००/— |
| ९ | विना परवानगी शहरात जाहिरातीचे फलक,बॅनर, होर्डींग इत्यादी सार्वजनिक, खाजगी जागा, विद्युत खांब, वृक्ष, कंपाऊड वॉल, पूल इत्यादी ठिकाणी लावणे. | The Outdoor Advertising Policy, Nagpur 2001 नुसार कार्यवाही करणे. |

| | | |
|---|---|---|
| १० | वाहतुकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तीक कामाकरीता बंद करणे | यासंदर्भात विविध उत्सवाच्या / समारंभाच्या वेळी सार्वजनिक रस्त्यांवर किंवा पादचारी मार्गावर उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप – मंच – स्वागतद्वार – कमानी इत्यादींना परवानगी देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मनपाच्या धोरणा नुसार कार्यवाही करणे. |
| ११ | सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी जनावरे बांधणे | रु. ५००/– |
| १२ | रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी वाहने/जनावरे धुवून परिसर अस्वच्छ करणे. | रु. ५००/– |
| १३ | चिकन सेंटर, मटन विक्रेते यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी टाकणे | रु. ५००/– |
| १४ | वैद्यकिय व्यवसायिकांनी बॉयोमेडीकल वेस्ट सर्वसाधारण कचऱ्यात टाकणे | Bio-Medical waste (Management and handling) Rules-1998 अंतर्गतकार्यवाही करणे. |
| १५ | वर्कशॉप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा अवांछीत ठिकाणी कचरा टाकणे | रु. ५००/– |
| १६ | ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक कॅरीबॅग निर्माते, विक्री करणारे, स्टॉक करणारे इत्यादी | महाराष्ट्र अविघटनशिल कचरा नियंत्रण अधिनियम २००६नुसार कार्यवाही |
| | अ) फुटपाथ, पथारी टाकून, हातगाडीवर व्यवसाय करणारे अत्यंत लहान/किरकोळ विक्रेते | रु. २००/– |
| | ब) पक्के बांधकाम/दुकान असलेले व्यवसायीक | रु. १०००/– |
| १७ | सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी विना परवानगी बांधकाम साहीत्य (Construction Material) साठवणे. प्रथम ४८ तासात हटविण्याची नोटीस देवुन न हटविल्यास | व्यक्ती– रु. १०००/– प्रति दिन |
| | | बिल्डर– रु. ५०००/– प्रति दिन |
| १८ | सार्वजनिक ठिकाणी, रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/ साठवणे. प्रथम ४८ तासात हटविण्याची नोटीस देवुन न हटविल्यास | व्यक्ती– बांधकामाचा मलबा/ टाकावू कचरा उचलण्याकरीता येणारा प्रत्यक्ष खर्च + खर्चाच्या ५० टक्के प्रशासकीय शुल्क वसुल करणे |
| | | बिल्डर– बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा उचलण्याकरीता येणारा प्रत्यक्ष खर्च + खर्चाच्या १०० टक्के प्रशासकीय शुल्क वसुल करणे |
| १९ | अ) उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव(व्यक्ती) | रु. १००/– |
| | ब) उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव(संस्था) | रु. ५००/– |

उपरोक्त प्रमाणे न्यूसन्स डिटेक्शन स्क्वॅड वर होणारा अपेक्षित खर्चास मंजूरी व प्रावधान उपलब्ध करुन देणे आणि उपद्रवाच्या प्रकारानुसार प्रशासकीय शुल्क रक्कम ठरविण्याचा प्रस्ताव विचारात घेण्याकरीता सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन,

| अ. क्रं. | ठिकाण | प्रशासकीय शुल्क |
|---|---|---|
| २० | सार्वजनिक ठिकाणी ओला किंवा सुका कचरा जाळुन उपद्रव निर्माण करणे. | रु. १००/— |
| २१ | हरीत लवाद यांनी दिलेल्या दि. ०३.०७.२०१७ च्या आदेशाप्रमाणे व दिलेल्या निर्देशाप्रमाणे विवाह सभागृह व लॉन्स यावर कार्यवाही करणे. | |

तसेच विभागाने प्रस्तावित केलेले प्रशासकीय शुल्क दिनांक ०१.०४.२०१८ नंतर यामध्ये दुप्पट वाढ करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येते.

विभागाने तातडीने जाहिरात काढून नियमाप्रमाणे भरती प्रक्रिया सुरु करावी या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 140 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर